**नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणांनी त्यांच्या स्वतःच्या सार्वजनीक इमारती व कार्यालये तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय/ निमशासकीय/सार्वजनिक उपक्रमांची कार्यालये यांच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
शासन परिपत्रक, क्रमांक - अशंस ०६१२/प्र.क्र.१२९/नवि-२०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ जून, २०१२

दिनांक २१ जून,२०१२ रोजी मंत्रालयाच्या मुख्य इमारतीत लागलेल्या भीषण आगीची शासनाने गांभीर्यपूर्वक नोंद घेतली असून शासकीय/निमशासकीय कार्यालये तसेच सार्वजनिक उपक्रमांची कार्यालये ज्यांच्याशी सामान्य जनतेचा कामानिमित्ताने अथवा पत्रव्यवहाराच्या निमित्ताने नेहमी संबंध येतो अशा ठिकाणी कार्यरत अधिकारी/कर्मचारी आणि तेथे येणा-या जनतेच्या जिवितास तसेच कार्यालयीन अभिलेखास कोणत्याही प्रकारे हानी पोहचू नये यासाठी सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण यांनी पुढीलप्रमाणे अविलंब कार्यवाही करावी.

०२. (i) राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच विशेष नियोजन प्राधिकरण यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालये तसेच त्यांच्या स्वतःच्या सार्वजनिक इमारती व कार्यालये यांच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण (Fire Safety Audit) सर्वोच्च प्राधम्याने एक महिन्याच्या आत करावे. सदर अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/विशेष नियोजन प्राधिकरण यांच्याकडील महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ प्रमाणे अर्हता धारण करणा-या अग्निशमन अधिकारी यांच्यामार्फत किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी नोंदणीकृत केलेल्या अनुज्ञप्तीधारक अभिकरणांमार्फत करुन घेण्यात यावे. सदर अनुज्ञप्तीधारक अभिकरणांची यादी www.mahafireservice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

शासकीय कार्यालये तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांची कार्यालये व त्यांच्या ताब्यातील सार्वजनिक इमारतींच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण करताना परिशिष्ट-एक मधील मागदर्शनपर तपासणीसूची वापरण्यात यावी व कार्यालय निहाय अग्निसुरक्षा व्यवस्था परीक्षण अहवाल परिशिष्ट-दोन मध्ये संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुझ-पूर्व, मुंबई-४०००९८ यांचेकडे तसेच info@mahafireservice.gov.in या ईमेल वर सादर करण्यात यावेत. कोणत्याही शासकीय कार्यालयाच्या किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्था किंवा विशेष नियोजन प्राधिकरणांच्या सार्वजनिक इमारतीच्या व कार्यालयांच्या अग्निशमन व्यवस्थेत काही उणीवा/दोष आढळल्यास त्या संबंधीत प्राधिकरणांच्या निदर्शनास आणून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे हे देखील संबंधीतांना कळविण्यात यावे.

(ii) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था किंवा विशेष नियोजन प्राधिकरण यांच्या कार्यक्षेत्रातील निमशासकीय संस्था व सार्वजनिक उपक्रमांच्या कार्यालयांच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी नोंदणीकृत केलेल्या अनुज्ञप्तीधारक अभिकरणांमार्फत एक महिन्यात करुन घेण्यास संबंधीत निमशासकीय संस्था/सार्वजनिक उपक्रमांच्या संबंधीत कार्यालय प्रमुखांना लेखी निर्देश देण्यात

...वेत व त्यांचे लक्ष महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील ...संदर्भातील कलम ५, ६, ७ व ८ च्या तरतूदींकडे वेधण्यात यावे. एखादया निमशासकीय संस्था/सार्वजनिक उपक्रम यांनी त्यांच्या कार्यालयाच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण नोंदणीकृत केलेल्या अनुज्ञप्तीधारक अभिकरणांमार्फत विहित कालावधीत करुन न घेतल्यास महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ५ खालील तरतूदीनुसार संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा किंवा संबंधीत मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी अशा कार्यालयाच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण नामनिर्देशित अधिका-यामार्फत करुन घ्यावे. तदनंतर सदर परीक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या अग्निसुरक्षा व्यवस्थेतील उणीवा व आवश्यक उपाययोजना कलम ६ अन्वये संबंधीतांना कळविण्यात याव्यात व विहित कालावधीत ...संबंधात अनुपालन करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा.

...३. सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/विशेष नियोजन प्राधिकरणे यांचेकडून त्यांची स्वतःची कार्यालये व त्यांच्या ताब्यातील सार्वजनिक इमारती, शासकीय/निमशासकीय कार्यालये तसेच सार्वजनिक उपक्रमांची कार्यालये यांच्या अग्निसुरक्षा व्यवस्था परीक्षणाबाबतचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी एकूणच राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण यांची स्वतःची कार्यालये व त्यांच्या ताब्यातील सार्वजनिक इमारती तसेच शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रमांच्या कार्यालयामधील अग्निसुरक्षा व्यवस्थेबाबत तात्काळ करावयाच्या उपाययोजना तसेच भविष्य काळात करावयाच्या उपाययोजना यांच्या विषयी आपला एकत्रित अहवाल योग्य त्या शिफारशींसह शासनाकडे दिनांक ३० सप्टेंबर,२०१२ पर्यंत सादर करावा.

**(मनु कुमार श्रीवास्तव )**
**प्रधान सचिव, नगर विकास विभाग.**

प्रत :,

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
सर्व मा.मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
सर्व मा.राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, विद्यानगरी, सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०००९८.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई-४०००९३.
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.
संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०००३०.
विभागीय आयुक्त.(सर्व)
महानगरपालिका आयुक्त.(सर्व)
सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण.
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म्हाडा.
जिल्हाधिकारी.(सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.(सर्व)
नगरपरिषदांचे मुख्याधिकारी.(सर्व)
निवडनस्ती/नवि-२०.